# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 04/01/2022 (मंगळवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील व्दारका सिटी उमरेड येथे दिनांक 02/01/2022 चे 17.30 वा. ते दिनांक 03/01/2022 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– तांबेकर शामराव पूरके वय 35 वर्ष रा.मांगरूळ ता भिवापूर हे घरबांधकामाचे ठेकेदारीचे काम करतात. ते दवारका सिटी उमरेड येथे निलेश फंदी यांचे घराचे मागील खाली जागेत एक महिण्यापासुन मकानाचे बांधकामासाठी लागणारे साहित्य 40 नग प्लायवुड सामान खाली जागेवर ठेवले होते. दि.02.01.2022 रोजी फिर्यादीने व्दारका सिटी उमरेड येथे सुरू असलेल्या मकानाच्या कामावर जावमन मकानाचे स्लाप तयार करण्याकरिता प्लाय ठोकले व उरलेले प्लाय खाली खुल्या प्लाटवर ठैवले व सायं. 05.30 वा. दरम्यान घरी निघुन गेले. फिर्यादी हे घटनास्थळी गेले असता फिर्यादीचे ठेवलेले उर्वरित 24 सेंट्रींगचे प्लायवूड प्लाय कि. 40,000/–रू. चा मुद्देमाल दिसुन आला नाही सदर माल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मनोज वाघ मो.क्र. 9822852501 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. बोरी :– दिनांक 31/12/2021 चे 08.00 वा. ते दिनांक 01/01/2022 चे 07.53 वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय 17 वर्ष हिच्या मामाचे अकाउंट मधले एटीएम व्दारे एक लाख कोणीतरी काढले याची विचारपूस करण्याकरिता दिनांक 31/12/2021 रोजी फिर्यादी तीचे मामा,मामी,आई यांचेसह युनियन बॅक बुटटीबोरी येथे गेली होती. त्यादरम्यान आरोपी नामे– भारत मेश्राम(बॅक मॅनेजर युनियण बॅक), वय 34 वर्ष रा. गांधी वार्ड ब्रम्हपूरी रोड देसाई गंज त. वडसा जि.गडचिरोली ह.मु गोदरेज आनंदम बी टॉवर गणेशपेठ मॉडेल मिल नागपूर यांनी फिर्यादीला दि.31/12/2021 ते 01/01/2022 पर्यंत त्यांच्या वॉटसअप मोबाईल वरून फिर्यादी हिचे मोबाईलवर वॉटसअप केले की, 'तु मला आवडतेस, आयलव्हयु, आयमीसयु' असे मॅसेज करून त्रास देत होता.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 ड भादंवी सहकलम 11, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि आरती उघडे मो. क्र. 8355947473 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत अंबाडा वार्ड रामटेक येथे दिनांक 01/01/2022 चे 15.00 वा. ते 15.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शिवानी सुरेश जैस्वाल वय 24 वर्ष, रा. अंबाडावार्ड रामटेक ही तिचे परिवारासह बाहेरून घरी परत आली असता आरोपी क्र. 1) अनील शामराव मुलमुले, 2) सुनील शामराव मुलमुले, 3) तृप्ती मनीष मुलमुले, 4) रूत्वीक सुनील मुलमुले, 5) अनीकेत सुनील मुलमुले व 6) मनीष शामराव मुलमुले सर्व रा. अंबाडा वार्ड रामटेक यांनी बेकायदेशीर जमाव जमवुन फिर्यादीचे परीवारास शिवीगाळ करू लागले. यानंतर आरोपीतांनी दंगा करून प्राणघातक शस्त्र लाठी घेवुन फिर्यादीचे घराचा दरवाजा डंडयांनी तोडुन घरात घुसुन फिर्यादीचे घरची फोरव्हीलर व मोटार सायकल ला तोडफोड करून नुकसान केले. सदर वादाचा निलेश जैस्वाल याने फिर्यादी फियादीचे परीवाराचे लोक व आरोपीतामंध्ये समझौता केला. त्यामुळे फिर्यादीने घटनेनंतर रिपोर्ट दिली नही परंतु समझौता प्रमाने आरोपीतांनी अटीशर्ती पुर्ण न केल्याने आज रोजी फिर्यादी रिपोर्ट देण्यास आली करीता आरोपीतांनी समान उद्‌देशाने संगनमताने बेकायदेशीर जमाव जमवुन शिवीगाळ करून दंगा करून फिर्यादीस व तिचे आईस प्राणघातक शस्त्र डंडयानी व पथ्थरनी मारहाण करून जबर दुखापत केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 149, 452, 427, 324 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी यावले मो.नं. 9011655284 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर